पुढारी

# ‘रवळनाथ’ने साजरी केली बांधकाम मजुरांसोबत दिवाळी

## चांगुलपणाच्या चळवळीअंतर्गत उपक्रम; दुंडगे, गिजवणे येथे कामगारांना फराळ वाटप

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

संकेश्वर-बांदा महामार्गाच्या कामासाठी मध्य प्रदेशातून आलेल्या परप्रांतीय रस्ते बांधकाम मजुरांना दिवाळीचा फराळ वाटप करून येथील श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी केली. परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी सुरू केलेल्या चांगुलपणाच्या चळवळीअंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती.



**संकेश्वर-बांदा महामार्गाच्या कामासाठी आलेल्या मजुरांना रवळनाथ परिवारातर्फे फराळ वाटप करताना एम. एल. चौगुले व संचालक.**

पोटा-पाण्यासाठी राज्यांच्या सीमा ओलांडून गाव, घर आणि नातेवाईकांपासून हजारो किलोमीटर लांब रस्ता बांधणीच्या कामासाठी दुंडगे, गिजवणे येथे आलेल्या मजुरांची आस्थेने विचारपूस करण्यात आली.

संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी उपक्रमाचा हेतू स्पष्ट केला. यावेळी संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजय आरबोळे, महेश मजती, मीना रंगणे, रेखा पोतदार, उमा तोरगल्ली, सीईओ डी. के. मायदेव, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Nov 12, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in